# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
दुरध्वनी - ०२५३-२३१५८६०, फॅक्स - (०२५३) २३१५८६०
www.mahashabri.com Mail :- shabarinsk@gmail.com

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी/समूह/सह.संस्था (FPO/FPG/FPC) यांच्या अडचणींबाबत आढावा घेऊन आराखडा तयार करणे.**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी भागात महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास प्रकल्पांतर्गत व इतर शासकीय योजनांमार्फत बऱ्याच आदिवासी शेतकरी उत्पादक कंपन्या/समूह/सह.संस्था स्थापन होऊन त्यांना अनुदान देखील प्राप्त झाले आहे. काही आदिवासी शेतकरी समुह कंपनी/सहकारी संस्था स्थापन न करता एकत्रित व संघटीतपणे व्यवसाय करीत असतील असे समुह व शेतकरी उत्पादक कंपन्या /समुह / सहकारी संस्था इत्यार्दीना आर्थिक अडचणी असु शकतात. या विविध अडचणींचा आढावा घेऊन त्याबाबतचा आराखडा तयार करण्याचा शबरी महामंडळाचा (शासन अंगीकृत) मानस आहे.

अशा आदिवासी भागातील गरजू लाभार्थीना स्थानिक पातळीवरील आवश्यक व्यवसायासाठी खेळते भाग भांडवल (Working Capital) / कर्ज / सहाय्य उपलब्ध करुन देणेबाबत, तसेच ज्यांची शेतकरी उत्पादक कंपनी सुरु झालेली आहे, अशा आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी/समूह/सह.संस्था यांना सक्षम करण्याकरीता, त्यांच्या कच्च्या मालावर प्रक्रीया करणे, त्या मालाचे ब्रॅण्डिंग करुन बाजारपेठेत वितरण/विक्री करणे, त्याचप्रमाणे माल साठवणूकी करीता स्टोअर/गोडाऊन बांधण्याकरीता कर्ज रुपाने सहाय्य अपेक्षीत असणे. शासनाच्या विविध विभागाकडून समन्वय अपेक्षीत असणे अथवा या व्यतिरिक्त इतर अन्य मदत अपेक्षीत असणे. अशा स्वरुपाच्या अडचणींबाबतचा सविस्तर आढावा घेऊन विस्तृत आराखडा तयार करावयाचा आहे.

वरील अडचणींबरोबरच आदिवासी शेतकरी बांधवांसाठी बी-बीयाणे व खते यांची प्रतवारी व किंमतीत बचत, उत्पादन खर्चात बचत करुन जास्तीत जास्त उत्पादन क्षमता वाढविणे, कच्च्या मालाची साठवणूक करुन एकत्रितपणे घाऊक बाजारपेठेत मालाची वाहतूक व विक्री करणे या स्वरुपाच्या अडचणींचा देखील आराखडा तयार करावयाचा आहे. आपले माहितीमध्ये अपेक्षीत असलेल्या बाबींबाबतची प्रश्नावली सोबत दिलेली आहे. त्यानुसार वस्तुनिष्ठ पणे सदर बाबींचा उल्लेख आपल्या माहितीत करण्यात यावा.

तसेच अहिंसक वन्य मध उपज बाबत देखील इच्छुक आदिवासी समुहांकडून प्रस्ताव मागविणेत येत आहेत.

याकरीता अशा विविध स्वरुपाच्या अडचणी असलेल्या आदिवासी शेतकरी उत्पादक कंपन्या/समूह/सह.संस्था यांनी त्यांची माहिती मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-४२२००२ यांचे कार्यालयात पोस्टाद्वारे अथवा shabarinsk@gmail.com या ई-मेल वर पाठवावी. आवश्यकतेनुसार अन्य सविस्तर माहिती संपर्क साधुन मागविण्यांत येईल.

(नितीन का.पाटील, भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,
नाशिक-२

# आदिवासी शेतकरी समुह / कंपनी / सहकारी संस्था यांचेकडून अपेक्षीत असलेल्या माहिती बाबतची प्रश्नावली

**अ) उत्पादन प्रक्रियेबाबत..**

१) आदिवासी भागातील गरजू लाभार्थींना स्थानिक पातळीवरील आवश्यक व्यवसायासाठी खेळते भाग भांडवल (Working Capital) अपेक्षित आहे काय ?
२) कर्ज किंवा आर्थिक सहाय्य अपेक्षित आहे काय ?
३) अनुदान अपेक्षित आहे काय ?
४) शासनाच्या विविध विभागाकडून समन्वय अपेक्षित आहे काय ?
५) वरील व्यतिरिक्त इतर अन्य मदत अपेक्षित आहे काय ?
६) वरील स्वरुपाच्या अडचणींबाबत वस्तुनिष्ठपणे माहीती नमुद करावी.

**ब) शेती उत्पादनाबाबत..**

१) वरील अडचणींबरोबरच आदिवासी शेतकरी बांधवांसाठी बी-बीयाणे व खते यांची प्रतवारी व किंमतीत बचत.
२) उत्पादन खर्चात बचत करुन जास्तीत जास्त उत्पादन क्षमता वाढविणे.
३) कच्च्या मालाची साठवणूक करुन एकत्रितपणे घाऊक बाजारपेठेत मालाची वाहतूक व विक्री करणे.
४) शेतीविषयक अन्य सहाय्य उपलब्ध करुन देणेबाबत,
५) कच्च्या मालावर प्रक्रीया करणे.
६) शेतमाल व प्रक्रिया केलेल्या मालाचे ब्रॅण्डिंग करुन बाजारपेठेत वितरण/विक्री करणे.
७) शेतमाल व प्रक्रिया केलेला माल साठवणूकी करीता स्टोअर/गोडाऊन बांधण्याकरीता कर्ज रुपाने सहाय्य अपेक्षीत असणे. त्यादृष्टीने आपले माहितीमध्ये वर अपेक्षीत असलेल्या बाबींचा त्यानुसार वस्तुनिष्टपणे उल्लेख आपल्या माहितीत करण्यात यावा.

**क) अहिंसक वन्य मध उपज-**

१) आपल्या आदिवासी भागात वन्य मध आहे किंवा कसे ? त्याबाबतचा तपशिल.
२) वन्य मध काढण्याची सध्याची पद्धती.
३) आपण वन्य मध काढू इच्छित असल्यास कशा पद्धतीने प्रक्रिया राबविणार ?
४) वरील बाबत प्रशिक्षण आवश्यक असल्यास कोणा मार्फत घेणार ?
५) शासन / महामंडळामार्फत याकरीता आपणास कोणत्या स्वरुपाच्या मदतीची अपेक्षा आहे ?
६) वन्य मध विक्री करीता आपण काय नियोजन केलेले आहे ?
७) वन्य मध उपज काढण्याकरीता कोणत्या गावातील आदिवासी कार्य करणार आहेत, त्या आदिवासींचे नाव, आधारकार्ड व त्यांचे संबंधीची इतर माहिती नमुद करावी.

**टिप-**

१) वरील सर्व प्रस्ताव फक्त आदिवासींकडून अपेक्षीत आहेत.
२) प्रस्ताव पाठविणेस मुदतीबाबत कोणतेही निर्बंध नाहीत.
३) प्रस्ताव सादर करतांना त्यामध्ये आपला ई-मेल, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी अथवा भ्रमणध्वनी क्रमांक इ. बाबी नमुद कराव्यात. ज्यायोगे आवश्यकतेनुसार आपल्याशी संपर्क साधणे सुलभ होईल.
४) आपला प्रस्ताव स्वयंस्पष्ट व वस्तुनिष्ठ असणे अपेक्षीत आहे. ज्यामुळे शबरी महामंडळ आपणास कशा प्रकारे मदत करु शकेल याबाबतचे नियोजन करणे शक्य होईल.
५) आपण सादर केलेला प्रस्ताव कुठल्याही योजनेसाठी अर्ज नसुन आदिवासी भागात वरील विषयावर काम करण्याकरीता शासनाकडून कोणत्या मदतीची आवश्यकता आहे ही बाब जाणून घ्यावयाचे दृष्टीने एक प्रामाणिक प्रयत्न आहे.